# बुकगंगातर्फे आजपासून ऑनलाइन कवी संमेलन

*बुकगंगा* डॉट कॉम तर्फे उद्यापासून (दि. २६) पहिले ऑनलाइन विश्व कवी संमेलन सुरू होत आहे. कोणताही प्रवासखर्च न करता कवींना या संमेलनात सहभागी होणार आहे. जापानपासून ते अमेरिकेपर्यंतचे कवी, साहित्यिक, वाचक या हायटेक कवी संमेलनाचा आनंद घेऊ शकणार आहेत. मायविश्व कॉर्पोरेशनच्या संचालिका सुप्रिया लिमये यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली. संचालिका प्रीती चितळे-गोहाड यावेळी उपस्थित होत्या. गेल्यावर्षी ऑनलाइन साहित्य संमेलन घेतले होते. यंदा ऑनलाइन कवी संमेलन आयोजित करण्यात आले आहे. हे कवी संमेलन ११ दिवस चालणार असून, संमेलनात सहभागी होऊ इच्छीणाऱ्या कवींना त्यांच्या कविता थेट बुकगंगा डॉट कॉमवर पोस्ट करता येणार आहेत. ज्या कवितेला सर्वात जास्त लाइक्स मिळतील त्या कवितेस सर्वोत्तम कवितेचा पुरस्कार मिळणार आहे. प्रथम क्रमांकाच्या कवितेस ३ हजार रुपये, द्वितीय २ हजार रुपये आणि तृतीय क्रमांकाच्या कवितेस १ हजार रुपयांचे बक्षीस दिले जाणार आहे. तसेच पाच कवितांना उत्तेजनार्थ पुरस्कार देण्यात येणार आहेत. या ऑनलाइन कवी संमेलनात सादर होणाऱ्या कविता सासवड येथे होणाऱ्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनात बुकगंगा डॉट कॉमच्या प्रदर्शन कक्षात प्रसारित केल्या जाणार आहेत, असे लिमये यांनी सांगितले.